# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३

## कार्यपत्रिका क्र. ८

## सभावृत्तांत

दिनांक :- ३/०८/२०२१ वेळ :- सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ३/०८/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुरेश शिवाजी भोईर - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा. संगिता राजेंद्र भोंडवे
५. मा.नामदेव जनार्दन ढाके
६. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७. मा.सचिन बाजीराव चिंचवडे
८. मा.अपर्णा निलेश डोके
९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१०.मा.राजेंद्र तानाजी गावडे
११.मा.निता विलास पाडाळे
१२. मा.विठ्ठल बबन भोईर
१३.मा.देविदास जिभाऊ पाटील

याशिवाय क्षेत्रीय अधिकारी श्रीमती सोनम देशमुख, श्री.नितीन देशमुख – कार्यकारी अभियंता, (विद्युत), श्री.चंद्रशेखर धानोरकर – उपअभियंता (स्थापत्य), श्री.भाऊसाहेब साबळे - उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.जावरानी एम टी – उपअभियंता(पाणीपुरवठा), श्री.राजेंद्र जावळे – उप अभियंता (जलनि:सारण), श्री.अकबर शेख- उपअभियंता(विद्युत), श्री.उमेश मोने – कनिष्ठ अभियंता,श्री.मोमीन ए ए – कनिष्ठ अभियंता(स्थापत्य उद्यान), , श्री.कुंडलिक दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, श्री.पारोल के.बी- मुख्य आरोग्य निरीक्षक इत्यादी उपस्थित होते

----------

**मा. सभापती**– सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

दिनांक ६/०७/२०२१ रोजीचा (कार्यपत्रिका क्र.७) सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र.                                        विषय क्र. १

दि. ३/०८/२०२१

सुचक : मा.करुणा चिंचवडे

संदर्भ :- १)मा.करूणा चिंचवडे यांचे दिनांक २९/०६/२०२१ चे पत्र

२)मा.करुणा चिंचवडे यांचे दिनांक ३/०२/२०२१ चे पत्र

मा.करूणा चिंचवडे यांचे दिनांक २९/०६/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१७ मधील चिंचवड ते रावेत या मार्गावर ३४.५० मीटर या रस्त्याचे काम सध्या पुर्णत्वाकडे असुन वाल्हेकरवाडी आणि रावेतला जोडणारा वाल्हेकरवाडी सीमेवरील पुलास राजमाता जिजाऊ ब्रिज व वाल्हेकरवाडी व रावेत चौक यांना जोडणा-या रस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे

सदर विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.

---------

ठराव क्र. २७                                        विषय क्र. २

दि. ३/०८/२०२१

सुचक : मा.नामदेव ढाके                                        अनुमोदक : राजेंद्र गावडे

संदर्भ - मा.नामदेव ढाके यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार

मा.नामदेव ढाके यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील सर्वे नं.८० पै व ८३ पैकीची जागा मधुन स्वामी विवेकानंद सोसायटी मध्ये राहणारे नागरिक व रहिवाशी यांना रस्त्याची अत्यंत गरज आहे. सद्यस्थीत सर्व रहिवाशी नागरिकांना जाणे येणेसाठी नॉन डीपी ९ मी.रस्ता, महाराष्ट्र अधिनियम कलम २०५ अन्वये बाधित शेतक-यांना प्रचलित पध्दतीने मोबदला देऊन रस्ता घोषीत करणेस तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०५ अन्वये नॉन डी पी बाधित जमीन धारकास पचलित पध्दतीने मोबदला देऊन रस्ता घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सुरेश शिवाजी भोईर]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ /२०२१.
दिनांक : १८/०८/२०२१

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ / /२०२१

दिनांक - १६/०७/२०२१

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
ब क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ नुसार प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली असुन सदरच्या समिती या कायद्याने गठीत केलेल्या आहेत. प्रभाग समितीत होणा-या कामकाजाबाबत कार्यवाही करणे हे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी आहे.

ब क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येते, या सभेत सर्व संबंधित शाखाप्रमुख यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

माननीय सदस्य यांनी आपले विभागाशी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अभ्यासपुर्वक माहिती समिती सभेत देणेत यावी तसेच प्रभाग समितीत झालेल्या सभावृत्तांतातील ठरावांवर नियमाधीन कार्यवाही करणेत यावी. याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडुन कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी. दिनांक ६/०७/२०२१ रोजी झालेल्या मासिक सभेमध्ये नगरसदस्यांनी खालीलप्रमाणे आपल्या समस्या मांडल्या, त्यावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा उचित अहवाल उलट टपाली प्रशासन विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय येथे पाठविणेत यावा.

| **अ.क्र.** | **मा.नगरसदस्य** | **उपस्थितीत केलेले प्रश्न** | **संबंधित विभाग** |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदेव ढाके | १) रावेत मधील सर्व्हे क्र.१३० व १२० च्या पुर्वेला नाल्याच्या बाजुला असणारा वहिवाटीचा रस्ता नागरीकांना येण्या जाण्यासाठी अपुरा पडत असल्याने तो रस्ता २०५ अंतर्गत १८ एम चा करणे.<br>२) काळेवाडी नदीशेजारी राडारोडा टाकणेत येत आहे याबाबत पर्यावरण विभागाने कार्यवाही करावी.<br>३) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील भोंडवे कॉर्नर, गुरुव्दारा चौक ते आकुर्डी रेल्वे स्टेशन रोड, केशवनगर बस स्टॉप जवळ तसेच मोरया गोसावी स्टेडीयम परिसर, केशवनगर येथील अनधिकृत पत्राशेड/बांधकाम हटविणे | स्थापत्य पर्यावरण |
| २ | मा.राजेंद्र गावडे | १) ओपन प्लॉट असलेल्या जागी अनेक प्रकारे अतिक्रमण केले जाते, याबाबत पर्यावरण विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.<br>२) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील चिंचवड गाव व काळेवाडी येथील पवना नदीच्या काठाजवळ काही नागरीक / ठेकेदार राडारोडा आणुन टाकत असल्याने नदीच्या पात्रात अडथळा निर्माण होत असुन संबंधित बाब ही मा.एनजीटी यांचे आदेशाचे उल्लंघन करणारी आहे, तरी अशा प्रकारे राडारोडा आणुन टाकणा-या नागरीकांवर /ठेकेदारांवर आपल्यामार्फत लवकरात लवकर कारवाई करणे | पर्यावरण अतिक्रमण |
| ३ | मा.मोनाताई कुलकर्णी | १) इंदिरानगरच्या पुढील चौकात विरंगुळा केंद्र करण्यात यावे. | स्थापत्य |

क्षेत्रिय अधिकारी तथा सहा . आयुक्त

ब क्षेत्रिय कार्यालय पिं.चि.मनपा

चिंचवड पुणे ३३